




# MPSC

# प्रचलित घडामोडी

## स्पेशल कोर्स (मराठी)

Headlines: ९ डिसेंबर ते १६ डिसेंबर २०१९

१७ डिसेंबर २०१९

# हेडलाईन्स

## नागरीकत्व दुरूस्ती विधेयकावर राष्ट्रपतींची स्वाक्षरी

- नागरिकत्व दुरुस्ती विधेयकावर राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी 12 डिसेंबर 2019 रोजी स्वाक्षरी केली आहे. त्यामुळे आता या विधेयकाचे कायद्यात रूपांतर झाले आहे. लोकसभेनंतर राज्यसभेतही या विधेयकाला मंजुरी देण्यात आली आहे.
- धार्मिक छळाला कंटाळून पाकिस्तान, बांगलादेश आणि अफगाणिस्तान या देशांतून 31 डिसेंबर 2014 पर्यंत भारतात आलेल्या हिंदू, शीख, बौद्ध, जैन, पारशी व ख्रिस्ती समुदायाच्या लोकांना बेकायदा स्थलांतरित मानले जाणार नाही आणि त्यांना भारतीय नागरिकत्व दिले जाईल, अशी तरतूद नागरिकत्व (दुरुस्ती) विधेयक 2019 मध्ये करण्यात आली आहे.

**या दुरुस्तीचा फायदा कोणाला नाही ?**

- श्रीलंकेतील तामिळ, म्यानमारमधील मुस्लिम, पाकिस्तानातील मुस्लिम व्यक्तींना या विधेयकाचा लाभ मिळणार नाही.

**देशातील कोणत्या भागाला लागू नसणार ?**

- राज्यघटनेच्या सहाव्या अनुसूचीत समाविष्ट असलेल्या आसाम, मेघालय, मिझोराम, त्रिपुरा या राज्यांतील आदिवासी भागांना, तसेच बंगाल इस्टर्न फ्रंटियर रेग्युलेशन, 1873 मध्ये अधिसुचित भागांना लागू असणार नाही.

**कोणत्या अटींमध्ये बदल करण्यात आले ?**

- सध्या कोणत्याही परदेशी व्यक्तीला भारताचे नागरिकत्व मिळवण्यासाठी भारतामध्ये कमीत कमी 11 वर्ष राहणे आवश्यक आहे. या विधेयकामध्ये ती अट शिथिल करून ती सहा वर्षे करण्यात आली आहे.
- यासाठी भारतीय नागरिकत्व कायदा, 1955 मध्ये बदल करण्यात आले आहेत.

**भारतीय नागरिकत्वाचा कायदा, 1955**

- राज्यघटना लागू झाल्यानंतर नागरिकत्व मिळविणे किंवा गमाविणे याबाबतच्या तरतुदी सन 1955 च्या नागरिकत्वाच्या कायद्यामध्ये नमूद केलेल्या आहेत.
- 2019 सालच्या दुरुस्तीला धरून आतापर्यंत या कायद्यात 9 वेळा दुरुस्त्या करण्यात आल्या आहेत.
- या कायद्यामध्ये नागरिकत्व मिळवण्याचे पाच मार्ग सांगितले आहेत :
  i) जन्माने प्राप्ती
  ii) वंशपरंपरेने प्राप्ती
  iii) नोंदणीद्वारे प्राप्ती
  iv) स्वीकृतीने प्राप्ती
  v) क्षेत्र विलीनीकरणाने प्राप्ती

## मानव विकास निर्देशांक 2019 जाहीर भारत 129 व्या क्रमांकावर

- संयुक्त राष्ट्राने 2019 सालासाठीचा 189 देशांचा मानव विकास निर्देशांक जाहीर केला या यादीत भारत 129 व्या क्रमांकावर आहे.
- या वर्षीच्या निर्देशाकांचे शीर्षक : 'Beyond Income Beyond Averages, Beyond Today, Inequalities in Human development in 21st Century'.
- 2018 मध्ये भारताचा क्रमांक 130 होता.
- या अहवालानुसार 2005-06 ते 2015-16 मध्ये भारतातील 27.1 कोटी लोक गरीबीतून बाहेर पडले.
- या अहवालानुसार दक्षिण आशिया सर्वात वेगाने वाढणारे क्षेत्र म्हणून जाहीर करण्यात आले आहे.
- 1990 ते 2018 मध्ये दक्षिण आशिया क्षेत्रात 46% वाढ झाली आहे.

**मानवविकास निर्देशांक (Human Development Index):**

- 1990 मध्ये पहिल्यांदा UNDP ने HDI जाहीर केला.
- याचे प्रेरणास्थान पाकिस्तानी अर्थतज्ज्ञ महबूब उल हक आणि अमर्त्य सेन हे आहेत. या दोघांना मानव विकास निर्देशांकाचे जनक म्हणतात.
- हा निर्देशांक तीन आयाम व चार निर्देशांक यांच्यावरून काढला जातो.
  1) दीर्घ व आरोग्यमय जीवन
  2) ज्ञान

3) चांगले जीवनमान

- या निर्देशांकाचे मूल्य 0 ते 1 दरम्यान व्यक्त केले जाते. 1 म्हणजे उच्च मानव विकास.

**भारत HDI – 2019**

- क्रमांक : 129
- HDI – 0.647

1) अपेक्षित शालेय वर्षे : 12.3

2) सरासरी शालेय वर्षे : 6.5

3) सरासरी आयुर्मान : 69.4 वर्षे

4) दरडोई स्थूल राष्ट्रीय उत्पन्न : 6.829 (GNI per capita)

**HDI 2019 नुसार प्रथम पाच देश :**

1) नॉर्वे : 0.954

2) स्वित्झर्लंड : 0.946

3) आयर्लंड : 0.942

4) जर्मनी : 0.939

5) हाँगकाँग : 0.939

## 'क्लायमेट इमर्जन्सी' वर्ड ऑफ द इअर 2019

- जगप्रतिष्ठित ऑक्सफर्ड शब्दकोशाने 'क्लायमेट इमर्जन्सी' या शब्दाची 2019 चा वार्षिक शब्द म्हणून निवड केली आहे.
- जो शब्द त्या वर्षातील समाजवास्तवाचे प्रतिनिधित्व करतो त्याची निवड दरवर्षी ऑक्सफर्ड 'वर्ड ऑफ द इअर' म्हणून करते.
- या शब्दाची 'वर्ड ऑफ द इयर' म्हणून झालेली निवड हे प्रतिबिंबित करते की हवामान आणीबाणी ही 2019 मध्ये जगाची खरी आस्था आहे.
- मागील वर्षी ऑक्सफर्डने वर्ड ऑफ द इअर म्हणून 'टॉक्सिक' या शब्दाची निवड केली होती.

## भारत–चीन हँड इन हँड युद्धसराव

- या युद्धसरावाचे आयोजन 7 ते 20 डिसेंबर 2019 दरम्यान मेघालयाची राजधानी शिलाँगजवळील उमरोई येथे करण्यात आली आहे.
- या युद्धसरावात दोन्ही देशांचे 100 ते 120 सैनिक सहभागी होतील.
- या युद्धसरावामध्ये दोन्ही देशांदरम्यान दहशतवादाचा बिमोड करणे, त्यासाठी संयुक्त नियोजन करणे आपत्ती व्यवस्थापन कारवायांचा सराव करणे यांचे आयोजन केले जाणार आहे.
- या सरावात दहशतविरोधी कारवाईचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे.
- भारत–चीन दरम्यान होणारा हा हँड इन हँड युद्धसराव या मालिकेतील 8 वा युद्धसराव असेल. यापूर्वी डिसेंबर 2018 मध्ये हँड इन हँड युद्धसराव पार पडला होता.
- या मालिकेतील सर्वात पहिला युद्धसराव 2007 साली कुन्मिंग (चीन) येथे पार पडला होता. परंतु त्यानंतर तो थांबविण्यात आला आणि 2013 मध्ये पुन्हा सुरू करण्यात आला.

## भारत ऑस्ट्रेलिया 2+2 संवाद

- तिसरा भारत–ऑस्ट्रेलिया सचिव–स्तरीय 2+2 संवाद 9 डिसेंबर रोजी नवी दिल्ली येथे पार पडला.
- यात भारताचे प्रतिनिधित्व संरक्षण सचिव अजय कुमार आणि परराष्ट्र सचिव विजय गोखले यांनी केले. तर ऑस्ट्रेलियाचे प्रतिनिधित्व संरक्षण सचिव ग्रेग मेरियर्ती आणि परराष्ट्र सचिव फ्रान्सिस ॲडमसन यांनी केले.
- हा 2+2 संवादापूर्वी भारत आणि ऑस्ट्रेलियाच्या संरक्षण सचिवांची द्विपक्षीय बैठक पार पडली. यात भारतीय संरक्षण सचिवांनी दोन्ही देशांच्या सशस्त्र दलांदरम्यानचा संरक्षण कार्याबाबत समाधान व्यक्त केले.
- यापूर्वी अलिकडेच भारताने जपानसोबत पहिला मंत्रिस्तरीय 2+2 संवाद नवी दिल्ली येथे आयोजित केला होता.
- तसेच 19 डिसेंबर रोजी भारत–अमेरिकेदरम्यान मंत्रिस्तरीय 2+2 संवाद वॉशिंग्टन येथे आयोजित केला जाणार आहे.

## पोलंडची युरोपियन युनियन हवामान तटस्थता करार 2050 मधून माघार

- युरोपियन युनियनने अणुऊर्जेला पाठिंबा देण्यासाठी व आर्थिक संक्रमणसाठी अधिक निधीची मागणी केली. या कारणाने पोलंडने हा निर्णय घेतला.

**युरोपियन युनियन हवामान तटस्थता करार (Climate Neutrality Deal of EU) :**

- ही योजना 2015 च्या पॅरिस कराराअंतर्गत एक मुख्य प्रतिबद्धता आहे.
- 2050 पर्यंत निव्वळ हरितगृह वायु उत्सर्जन शून्य

करण्यासाठी ही 100 अब्ज युरोची योजना आहे.

- संयुक्त संस्थाने व चीन यानंतरचा हरितगृह वायू उत्सर्जन करणारा EU सर्वात मोठा आर्थिक गट आहे.
- या करारास युरोपियन 'ग्रीन डील' असेही म्हणतात.

**युरोपियन युनियन :**

- हा युरोप खंडातील 28 देशाचा संघ आहे.
- स्थापना : मास्त्रिच करारानुसार 1993 मध्ये औपचारिकरीत्या EU स्थापन झाले.
- राजकीय व आर्थिक संघटना

## जगातील पहिल्या पूर्णपणे इलेक्ट्रॉनिक विमानाचे उड्डाण

- शून्य उत्सर्जन करणाऱ्या या विमानाने सिद्ध केले की इलेक्ट्रॉनिक विमानाचा व्यावसायिक उड्डाणासाठी वापर केला जाऊ शकतो.
- हे विमान व्हॅनकुवर (कॅनडा) पासून जवळपासच्या बेटांवर प्रवास करेल.
- हे विमान हार्बर एअर कंपनीने बनविले.
- भारतामध्येसुद्धा इ वाहनांबद्दल जागरूकता वाढवण्याचे मोठ्या प्रमाणात प्रयत्न सुरू आहेत.
- भारत सरकार यासाठी फेम (Faster Adoption and Manufacturing of Electirc Vehicles in India) कार्यक्रम राबवत आहे

## सभागृहात प्रथमच बोलली गेली संथाली भाषा

- 6 डिसेंबर 2019 रोजी राज्यसभेत प्रथमच संथाली ही आदिवासी भाषा बोलली गेली. संसदेच्या सभागृहात संथाली भाषा बोलली जाण्याची ही पहिलीच वेळ होती.
- राज्यसभेच्या ऐतिहासिक 250 व्या सत्रात बिजु जनता दलाच्या खासदार सरोजिनी हेम्ब्रम संथाली भाषेत बोलल्या.
- ओदिशातील आदिवासींमध्ये बोलली जाणारी संथाली भाषा राज्यघटनेतील आठव्या परिशीष्टातील 22 अधिकृत भाषांपैकी एक आहे.
- 2003 साली 92 व्या घटनादुरुस्तीने राज्यघटनेच्या आठव्या परिशिष्टात संथालीसह मैथिली, बोडो व डोगरी या भाषांचा समावेश करण्यात आला होता.
- ओदिशा व्यतिरिक्त बिहार, झारखंड, पश्चिम बंगाल, आसाम या राज्यांमध्ये तसेच नेपाळ व बांगलादेश येथील काही भागांमध्ये ही भाषा बोलली जाते.
- **8 व्या परिशिष्टातील 22 भाषा :** आसामी, बोडो, गुजराती, कन्नडा, कोकणी, मल्याळम, मराठी, ओरिया, संस्कृत, बंगाली, डोगरी, हिंदी, कश्मीरी, मैथिली, मणिपुरी, नेपाळी, पंजाबी, संथाली, सिंधी, तमीळ, तेलुगू, उर्दू

## राफेल विमानांना धनोआ यांच्या सन्मानार्थ टेल नंबर

- भारतीय वायुसेनेचे माजी हवाई दलाचे प्रमुख बी. एस. धनोआ यांच्या नावाने राफेल लढाऊ विमानांना टेल नंबर देण्याचा निर्णय घेतला आहे. या विमानाच्या विंग्सवर BS ही अक्षरे असतील.
- टेल नंबर हा विमानांचा ओळख क्रमांक असतो. देशात उड्डाण करणाऱ्या प्रत्येक विमानास टेल नंबर प्रदान केलेला असतो.
- आंतरराष्ट्रीय नागरी उड्डाण कराराच्या मानदंडानुसार विमानांना टेल नंबर प्रदान केले जातात. या करारास शिकागो करार म्हणूनही ओळखले जाते.
- या करारानुसार प्रत्येक नागरी विमानाची नोंद राष्ट्रीय विमान प्राधिकरणाकडे करणे आवश्यक आहे. हा नोंदणी क्रमांक म्हणजेच विमानाचा टेल नंबर असतो.

**आंतरराष्ट्रीय नागरी उड्डाण संस्था (International Civil Aviation Organisation) :**

- आंतरराष्ट्रीय नागरी उड्डाण करारानुसार या संस्थेची स्थापना करण्यात आली आहे.
- 1944 मध्ये स्थापन झालेली ही संयुक्त राष्ट्रांची एक विशेष संस्था असून, ती आंतरराष्ट्रीय हवाई वाहतुकीच्या समन्वयासाठी जबाबदार आहे.

**बिरेंदर सिंग धनोआ यांच्याबद्दल**

- बिरेंदर सिंग धनोआ यांनी एअर चीफ मार्शल म्हणून भारतीय वायुसेनेमध्ये सेवा प्रदान केली आहे.
- त्यांचा जन्म बिहारमधील देवघर येथे झाला. त्यांचे वडील निवृत्त आयएएस अधिकारी होते.
- कारगील युद्धाच्या वेळी धनोआ व त्यांच्या पथकाने नाईट कोम्बिंगच्या नावीन्यपूर्ण पद्धतीचा वापर केला, जो यापूर्वी कधीच केला गेला नव्हता. या युद्धातील त्यांच्या शौर्यासाठी त्यांना वायुसेना पदक आणि युद्धसेवा पदक प्रदान करण्यात आले होते.

## समृद्धी महामार्गास बाळासाहेबांचे नाव

- मुंबई ते नागपूर या द्रुतगती समृद्धी महामार्गास 'बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्ग' असे नाव देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.

**महामार्गाविषयी :**

- मुंबई व नागपूर या शहरांना हा महामार्ग जोडतो.
- एकूण लांबी : सुमारे 710 किमी.
- आठ पदरी महामार्ग
- हा महामार्ग एकूण 10 जिल्ह्यातील 27 तालुक्यांतून जातो.
- तसेच महामार्गावर 24 ठिकाणी मेगासिटी उभारली जाईल.
- ठाणे, नाशिक, अहमदनगर, औरंगाबाद, जालना, वर्धा, बुलढाणा, वाशीम, अमरावती व नागपूर या 10 जिल्ह्यांतून हा मार्ग जाईल.
- तसेच इतर 14 जिल्ह्यांना याचा अप्रत्यक्ष फायदा होईल.

## दिव्यांगांसाठीचे पहिले न्यायालय महाराष्ट्रात

- केंद्रीय न्याय व विधिमंत्री रविशंकर प्रसाद यांनी दिलेल्या अधिसूचनेद्वारे स्थापना.
- दिव्यांगांसोबतच ज्येष्ठ नागरिकांच्या तक्रारींचे निवारण यामार्फत केले जाईल.
- जागतिक दिव्यांग दिनाचे औचित्य साधून 3 डिसेंबर रोजी शिवाजीनगर जिल्हा सत्र न्यायालय, पुणे येथे कामकाजास प्रत्यक्ष सुरुवात झाली.
- एच. आर. वाघमारे या विशेष न्यायालयाचे न्यायाधीश आहेत.

**महत्त्वाचे :**

- या न्यायालयांतर्गत तक्रार दाखल झाल्यानंतरच्या 6 महिन्यांत निकाल दिला जाणार आहे.
- अशा प्रकारचे हे राज्यातील पहिलेच न्यायालय आहे.

## डिजिटल तंत्रज्ञान प्रशिक्षणासाठी UNESCO व DELL चा उपक्रम

- भारतातील शिक्षकांना डिजिटल तंत्रज्ञानाविषयी प्रशिक्षण देण्याकरिता UNESCO MGIEP व DELL कंपनीचा ही संयुक्त उपक्रम आहे.
- या अंतर्गत डेल कंपनीचा 'डेल आरंभ II PC फॉर एज्युकेशन' उपक्रम आणि UNESCO MGIEP चे फ्रेमरस्पेस व्यासपीठ एकत्र येऊन हा प्रशिक्षण कार्यक्रम राबवणार आहेत.
- प्रथम टप्प्यात महाराष्ट्र, कर्नाटक व आंध्रप्रदेश या तीन राज्यांतील निवडक शिक्षकांना या अंतर्गत प्रशिक्षण दिले जाईल.

**महत्त्वाचे :**

- या उपक्रमामुळे UNO चे डिजिटल साक्षरतेचे 'शाश्वत विकास ध्येय 4 साध्य होण्यास मदत होईल.

**UNESCO MGIEP विषयी :**

- महात्मा गांधी शांती व शाश्वत विकास शिक्षण संस्था (Mahatma Gandhi Institute of Education for Peace) हा UNESCO आणि भारत सरकारचा संयुक्त उपक्रम आहे.
- स्थापना : 2012
- मुख्यालय : दिल्ली
- ही भारतातील पहिली UNESCO विशेष शिक्षण संस्था आहे.

## भारतीय कौशल्य अहवाल

- 9 डिसेंबर 2019 रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या भारतीय कौशल्य अहवालानुसार महाराष्ट्र देशातील सर्वाधिक रोजगारक्षम राज्य ठरले आहे.
- हा अहवाल खालील संस्थांनी संयुक्तपणे प्रसिद्ध केला आहे.

1) भारतीय उद्योग महासंघ (CII – Confederation of Indian Industry)
2) अखिल भारतीय तंत्रशिक्षण संस्था (AICTE)
3) संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम (UNDP)
4) भारतीय विद्यापीठ संस्था (AIU)

- हा अहवाल देशभरातील राज्यांमधील नागरिकांच्या रोजगाराबद्दल माहिती उपलब्ध करून देते.

**राज्यनिहाय क्रमवार :**

1. महाराष्ट्र,
2. तामिळनाडू,
3. उत्तरप्रदेश

**शहरनिहाय क्रमवार :**

1. मुंबई,
2. हैदराबाद,
3. पुणे

## भारतीय संस्कृती पोर्टल

- केंद्रीय सांस्कृतिक मंत्री प्रल्हाद सिंग पटेल यांनी भारताच्या समृद्ध, मूर्त व अमूर्त सांस्कृतिक वारशाची माहिती लोकांना प्राप्त करता यावी यासाठी भारतीय संस्कृती पोर्टल सुरू केले आहे.
- हे पहिले सरकारी अधिकृत पोर्टल आहे जिथे सांस्कृतिक मंत्रालयाच्या विविध संघटनांची माहिती व सांस्कृतिक संसाधने एकाच व्यासपीठावर उपलब्ध करून देण्यात आले आहे.
- हे पोर्टल भारतीय तंत्रज्ञान संस्था मुंबईने (IIT Bombay) विकसित केले आहे. तर माहिती संकलनाचे कार्य इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठांद्वारे (IGNOU) करण्यात आले आहे.
- हे पोर्टल देशभरातील अभिलेखागार संग्रहालये, अकादमी व ग्रंथालये यामधील दस्तऐवज, प्रतिमा, दृक् श्राव्य माहिती आणि अन्य माहिती संग्रहित करते.
- या पोर्टलवर सध्या 90 लाखांहून अधिक माहिती उपलब्ध आहे.
- हा प्रकल्प भारताच्या डिजिटल इंडिया उपक्रमाचा एक भाग आहे. जो देश विदेशात भारताच्या समृद्ध, मूर्त आणि अमूर्त सांस्कृतिक वारशाबद्दल माहिती देतो.
- हे पोर्टल सध्या इंग्रजी आणि हिंदी भाषांमध्ये उपलब्ध आहे.
- पोर्टलवर उपलब्ध सामग्री : दुर्मिळ पुस्तके, ई-पुस्तके, हस्तलिखिते, संग्रहालयातील कलाकृती, आभासी गॅलरी, अभिलेखागार, छायाचित्रे, भारतीय राष्ट्रीय ग्रंथसूची, व्हिडिओ इत्यादी.

## प्रधानमंत्री वनधन योजनेला 100 दिवस पूर्ण

- 7 डिसेंबर 2019 ला या योजनेला 100 दिवस पूर्ण झाले.
- या योजनेची सुरुवात आदिवासी मंत्रालयाने केली होती. ही योजना आत्तापर्यंत 24 राज्यांत चालू झाली आहे.

**वनधन योजना :**

- 14 एप्रिल 2019 ला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी बीजापूर (छत्तीसगढ) येथून या योजनेची सुरुवात केली.
- या योजनेचा उद्देश इमारतीसाठी उपयोगी नसलेल्या लाकडाचे उत्पादन करणे, वनांच्या वास्तविक संपत्तीचा उपयोग आदिवासींच्या उपजिविकेसाठी करणे व त्यासाठी त्याचे उत्पादन घेणे.
- यासाठी ही योजना त्यांना वनोत्पादनाच्या मूल्यवर्धनासाठी कौशल्य आणि क्षमता वाढविण्याचे कार्य करेल.
- हा कार्यक्रम आदिवासी मंत्रालयामार्फत आणि राष्ट्रीय स्तरावर आदिवासी सहकारी विपणन विकास संघाद्वारे (TRIFED) लागू केला जाणार आहे.

## केवळ आधार धारक बँक खातेदारांनाच प्रधानमंत्री किसान सम्मान निधी योजनेचा लाभ

- या योजनेअंतर्गत लाभ मिळविण्यासाठी आधार क्रमांक बँक खात्यास जोडणे आवश्यक असल्याचे सरकारने घोषित केले.

**प्रधानमंत्री किसान सन्मान योजना (PM – KISAN)**

- ही योजना केंद्रसरकारद्वारे छोट्या व सीमांत शेतकऱ्यांसाठी लागू केली आहे.
- या योजनेसाठी 75000 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.
- खराब हवामान व कमी किंमतीमुळे ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे, त्यांना आर्थिक सहाय्यता करणे हा या योजनेचा उद्देश आहे.
- या योजनेद्वारे शेतकऱ्यांच्या खात्यात 6000 रुपये तीन टप्प्यांत जमा केले जातात.
- या योजनेसाठी लाभार्थी म्हणून ज्या शेतकऱ्यांकडे 2 हेक्टर्सपेक्षा कमी क्षेत्र आहे अशांची निवड केली जाते.
- 12 कोटी शेतकऱ्यांचा या योजनेत समावेश करण्यात आला आहे.

## मुद्रा योजनेद्वारे 10 लाख कोटी कर्ज वाटप

- आतापर्यंत 10 लाख कोटी कर्ज या योजनेद्वारे देण्यात आल्याचे केंद्र सरकारने घोषित केले यापैकी 70% कर्ज लाभार्थी महिला आहेत.

**प्रधानमंत्री मुद्रा योजना (PMMY) :**

- या योजनेची सुरुवात 2015 मध्ये केली होती.
- या योजनेचा उद्देश असंघटित, बिगरशेती सूक्ष्म व लघु उद्योगांना कर्ज पुरवठा करणे हा आहे.
- हे कर्ज व्यापारी बँक, प्रादेशिक ग्रामीण बँक, लघु वित्त बँक, सहकारी बँक, MFI आणि NDFC द्वारे दिले

जाते.

- या योजनेद्वारे तीन प्रकारचे कर्ज दिले जाते.
  शिशू : 50,000 रुपयांपर्यंत
  किशोर : 50,000 ते 5 लाख रुपयांपर्यंत
  तरुण : 5 लाख ते 10 लाख रुपयांपर्यंत

**प्रादेशिक ग्रामीण बँका (Regional Rural Bank)**

- 1 जुलै 1975 मध्ये एम. नरसिंहन यांच्या कार्यगटाच्या शिफारसीनुसार भारतात ग्रामीण बँकांची साखळी निर्माण करण्यात आली.
- 2 ऑक्टोबर 1975 रोजी पाच प्रादेशिक ग्रामीण बँका स्थापन करण्यात आल्या.
  1) मोरादाबाद (उत्तरप्रदेश)
  2) गोरखपूर (हरियाणा),
  3) भिवानी (राजस्थान)
  4) जयपूर (राजस्थान)
  5) माल्दा (पश्चिम बंगाल)
- 1987च्या केळकर समितीच्या शिफारसीनुसार RRB ची संख्या कमी करण्यात आली.
- सिक्कीम व गोवा राज्यात प्रादेशिक ग्रामीण बँका नाहीत.

**कार्ये :**

- छोट्या व सीमांत शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करणे.
- भूमिहीन शेतकरी, कृषी कामगार, ग्रामीण कारागीर, लघु उद्योजक, व्यापारी यांना कर्जपुरवठा करणे.
- ग्रामीण भागात उद्योजकतेचा विकास घडवून आणणे.
- मागास भागाचा विकास करून प्रादेशिक असमतोल दूर करणे.

## ओदिशा राज्य सरकारचा 'वर्ल्ड हॅबिटॅट अवॉर्ड 2019' पुरस्काराने सन्मान

- संयुक्त राष्ट्रसंघ-अधिवास (UN-Habitat) या संघटनेच्या संयुक्त विद्यमाने ओदिशा राज्य सरकारला 2019 सालासाठीचा 'वर्ल्ड हॅबिटॅट अवॉर्ड' देऊन गौरविण्यात आले.
- ओदिशा सरकारच्या 'जगा मिशन' नावाच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी हा पुरस्कार देण्यात आला आहे.
- राज्य सरकारने या उपक्रमाच्या माध्यमातून दरिद्री लोकांचे शहरी जीवनमान उंचावण्याचा मार्ग जगाला दाखविलेला आहे.
- ओदिशा सरकारच्या जगा मिशन या पुढाकाराच्या अंतर्गत कायद्याद्वारे जमिनीचा हक्क देणे आणि झोपडपट्टी कमी करणे यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. त्यामुळे पायाभूत सुविधा आणि सेवांमध्ये सुधारणा दिसून आली आणि रोजगाराच्या संधींमध्ये देखील वाढ झालेली आहे.

**जगा मिशन :**

- ओदिशा सरकारने 7 मे 2018 रोजी हे अभियान सुरू केले होते.
- झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्या 1 लाख शहरी गरीब जनतेला स्वाभिमान आणि निर्वासितपणाच्या कायम भीतीपासून मुक्तता देण्याच्या आश्वासनाअंतर्गत लाभान्वित करणे हे या मोहिमेचे उद्दिष्ट आहे.
- टाटा ट्रस्ट आणि नॉर्मन फॉस्टर फाऊंडेशन यांच्या सहकार्याने हे मिशन राबविण्यात येत आहे.

**UN-अधिवास**

- स्थापना : 1978
- मुख्यालय : नैरोबी (केनिया)
- संयुक्त राष्ट्रसंघ-अधिवास म्हणजेच मानवी वसाहत आणि शाश्वत शहरी विकासासाठी समर्पित असलेली संयुक्त राष्ट्रसंघाची एक संघटना आहे.

## झोजिबिनी टुंझी मिस युनिव्हर्स 2019

- 2019 च्या 68 व्या मिस युनिव्हर्स विश्वसुंदरी किताब हा दक्षिण आफ्रिकेच्या झोजिबिनी टुंझी हिने जिंकला आहे.
- स्पर्धेचे ठिकाण : ॲटलांटा, अमेरिका
- 2019 च्या स्पर्धेत भारताची बर्निका सिंग सहभागी झाली होती.

**महत्त्वाचे :**

- आतापर्यंत भारताला 2 वेळा हा किताब जिंकता आला.
  1) 1994 : सुश्मिता सेन
  2) 2000 : लारा दत्ता

**स्पर्धेविषयी :**

- दरवर्षी घेतली जाणारी जागतिक सौंदर्य स्पर्धा
- 1952 मध्ये कॅलिफोर्निया येथे सर्वप्रथम आयोजन केले होते.

## रशियावर 4 वर्षांची क्रीडाबंदी

- जागतिक उत्तेजकविरोधी संघटनेने रशियावर 4 वर्षांची क्रीडाबंदी घातली आहे.
- उत्तेजक चाचणी माहिती संदर्भात फेरफार केल्याप्रकरणी ही बंदी घातली आहे.

**WADA : World Anti Doping Agency**

- स्थापना : 10 नोव्हेंबर 1999 रोजी आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक संघटनेतर्फे
- मुख्यालय : कॅनडा
- अध्यक्ष : सर क्रेग रिडी
- स्थापनेमागचे उद्दिष्ट : डोपिंग व ड्रग्जविरोधी लढ्याला प्रोत्साहित करणे.

**महत्त्वाचे :**

- 'वाडा' ने अथेन्स ऑलिंपिक 2004 साली डोपिंगविरोधी कारवाईस सुरुवात केली.
- **डोपिंग:** क्रीडाक्षेत्रात कामगिरी सुधारण्यासाठी खेळाडूंकडून मादक अंमली पदार्थांचे सेवन केले जाते त्यास डोपिंग म्हणतात.
- यासाठी 'वाडा' च्या जगभरात 35 प्रयोगशाळा कार्यरत आहेत.
- भारतात दिल्ली येथे अशा प्रकारच्या प्रयोगशाळा आहेत. (NADA- National Anti Doping Angency)
- 'वाडा' ने आतापर्यंत विविध प्रकारच्या 192 उत्तेजक अंमली पदार्थांवर बंदी घातली आहे यात ॲनाबोलिक स्टेरॉइडस्, अल्कोहोल बीटा-२, ॲग्रेस्टिक्स यांचा समावेश होतो.
- सुनील शेट्टी हे भारतातील NADA चे ब्रॅण्ड ॲम्बेसिडर आहेत.

## अबुधाबी जगातील अग्रगण्य क्रीडा पर्यटन स्थळ

- अबुधाबीची जगातील अग्रगण्य क्रीडा पर्यटन स्थळ म्हणून सातव्यांदा निवड झाली आहे.
- मस्कत (ओमान) येथे आयोजित जागतिक यात्रा पुरस्काराच्या 26 व्या आवृत्तीत हा प्रतिष्ठित पुरस्कार अबुधाबीला प्रदान करण्यात आला.

**अबुधाबी बद्दल**

- संयुक्त अरब अमिरातीची राजधानी अबुधाबी क्रीडा सुविधा व कार्यक्रमांचा विकास व प्रसार करून क्रीडा पर्यटन क्षेत्रात प्रगती करत आहे.
- 2019च्या सुरुवातीस अबुधाबी शोडाऊन सप्ताहाचा भाग म्हणून अबुधाबीने अल्टिमेट फायटिंग चॅम्पियनशिपसह 5 वर्षांची भागीदारी जाहीर केली होती.
- तसेच अलिकडेच अमिरातीने 2020 एफआयएनए शॉर्ट कोर्स वर्ल्ड चॅम्पियनशिपचे यजमानपद मिळविले आहे.

## दिनविशेष

## भ्रष्टाचारविरोधी दिन : 9 डिसेंबर

- 9 डिसेंबर हा दिवस 'आंतरराष्ट्रीय भ्रष्टाचारविरोधी दिन किंवा लाचलुचपत प्रतिबंधक दिन' म्हणून साजरा होतो.
- 2019 ची संकल्पना : 'युनायटेड अगेन्स्ट करप्शन फॉर डेव्हलपमेंट पीस अँड सिक्युरिटी'
- जगभरात सातत्याने 'युनायटेड अगेन्स्ट करप्शन' नावाने जागतिक मोहीम चालवली जाते.

**महत्त्वाचे :**

- 2003 साली संयुक्त राष्ट्रसंघात भ्रष्टाचारविरोधी दिवस पाळण्यासंबंधी ठराव मंजूर झाला.
- जगभरात प्रत्येक वर्षी अंदाजे एक लाख कोटी डॉलर एवढी रक्कम केवळ लाचेपोटी दिली जाते. तर 206 लाख कोटी डॉलरचा भ्रष्ट व्यवहार होतो.
- ही रक्कम जागतिक सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या (GDP) 5 टक्क्यांपेक्षा जास्त आहे.
- 'ट्रान्सपरन्सी इंटरनॅशनल' या संस्थेच्या 2018 च्या अहवालानुसार भ्रष्टाचाराच्या क्रमवारीत 180 देशांपैकी भारत 78 व्या स्थानावर आहे.
- सर्वात कमी भ्रष्टाचार : डेन्मार्क
- सर्वाधिक भ्रष्टाचार : सोमालिया

**भ्रष्टाचारविरोधी भारताच्या उपाययोजना**

- IPC कलम 161 मध्ये यासाठीची तरतूद आहे.
- 1988 मध्ये भारतात 'भ्रष्टाचारविरोधी कायदा' संमत करण्यात आला.
- 2013 मध्ये संसदेत भ्रष्टाचारास आळा घालणारे 'लोकपाल बिल' मंजूर केले होते.

## आंतरराष्ट्रीय पर्वत दिन : 11 डिसेंबर

- 11 डिसेंबर हा दिवस संयुक्त राष्ट्र संघाकडून

'आंतरराष्ट्रीय पर्वत दिन' म्हणून साजरा केला जातो.

- पहिला आंतरराष्ट्रीय पर्वत दिन 2003 साली साजरा केला गेला.
- 2019 ची संकल्पना : Mounts Matter for youth
- डोंगराळ व ग्रामीण राहणाऱ्या तरुणांची व्यथा या संकल्पनेतून मांडली गेली.

**महत्त्वाचे :**

- पृथ्वीवरील 22% भाग हा डोंगराळ प्रदेशाने व्यापला असून त्यात 13% म्हणजे 914 दशलक्ष लोकसंख्या राहते.
- UNO च्या महासभेने 2002 हे 'आंतरराष्ट्रीय पर्वत वर्ष' म्हणून जाहीर केले होते.

## आंतरराष्ट्रीय सार्वत्रिक आरोग्य छत्र दिन: 12 डिसेंबर

- दरवर्षी 12 डिसेंबर या दिवशी जगभरात 'आंतरराष्ट्रीय सार्वत्रिक आरोग्य छत्र दिन' साजरा करतात.
- या वर्षीची संकल्पना : किप द प्रॉमिस
- 12 डिसेंबर 2012 रोजी संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेत (UNGA) 'सार्वत्रिक आरोग्य छत्र' विषयक एक ठराव मंजूर केला त्यामध्ये सर्व सभासद देशांनी आपल्या देशातील नागरिकांची आरोग्यविषयक प्रगती करण्याचे मान्य केले.
- प्रत्येकाला सर्वत्र गुणवत्तापूर्ण व परवडणारी आरोग्य सेवा एका आंतरराष्ट्रीय पातळीवर प्राधान्याने उपलब्ध असावी, अशी या ठरावाची कल्पना आहे.
- सार्वत्रिक आरोग्य छत्र (Universal Health Coverage) आर्थिक अडचणीचा सामना न करता सर्वत्र लोकांना आवश्यक त्या गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा उपलब्ध करवून देण्याचे सुनिश्चित करते.
- संयुक्त राष्ट्रसंघाच्या अंदाजानुसार, जगातल्या निम्म्या लोकसंख्येला अजूनही आवश्यक आरोग्य सेवा उपलब्ध नाहीत. आरोग्य सेवांवर होणाऱ्या खर्चामुळे दरवर्षी सुमारे 100 दशलक्ष लोक अत्यंत गरीबीत जीवन जगतात.

**भारतातली आरोग्य सेवा**

- भारताच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नापैकी सुमारे 5 टक्के खर्च आरोग्यसेवांवर होतो.
- दर एक लक्ष लोकसंख्येमागे सरासरी 3 प्राथमिक आरोग्य केंद्रे उपलब्ध आहेत. 51 टक्के स्त्रियांना प्रसूती सेवा मिळतात.
- दर एक हजार लोकसंख्येमागे 1 रुग्णालय-खाट उपलब्ध आहे.
- ॲलोपथी प्रणालीमध्ये प्रशिक्षित चिकित्सकांचे प्रमाण भारतात दर एक हजार लोकसंख्येमागे 0.7 इतके आहे.
- आयुर्वेद व होमिओपथी चिकित्सकांचे प्रमाण दर एक हजार लोकसंख्येमागे 0.7 इतकेच आहे.
- दर हजारी लोकसंख्येमागे परिचारिकांची संख्या 0.8 इतकी आहे.